Pune Police

## प्रेसनोट दि. २५/०१/२०१७

### स्मार्ट फोन चोरी करणाऱ्या बाल गुन्हेगारास गुन्हे शाखा युनिट १ चे पथकाने घेतले ताब्यात

गुन्हे शाखा, युनिट १ कडील अधिकारी व कर्मचारी असे मिळून शिवाजीनगर पोलीस ठाणेचे हददीत झालेल्या चैन चोरीच्या गुन्हयाच्या अनुषंगाने समांतर तपास करीत असतांना त्यांना त्यांचे खास बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, शिवाजीनगर पोलीस स्टेशनचे हद्दीत झालेल्या उघडया दरवाज्या वाटे आत प्रवेश करून चोरी करणारा ओळखत असणारा विधिसंघर्षीत बालक हा त्याचे हातातील एक सॅकबॅगमध्ये काही स्मार्ट मोबाईल घेवून शिवाजीनगर एस.टी. स्टँड जवळ विक्री करण्यासाठी येणार आहे. अशी बातमी मिळाल्याने युनिट १ कडील अधिकारी व स्टाफ यांनी शिवाजीनगर एस.टी. स्टँड येथे सापळा रचून त्यास ताब्यात घेतले. त्याचेकडील सॅकबॅगची तपासणी केली असता त्यामध्ये वेगवेगळया कंपनीचे स्मार्ट मोबाईल आढळून आले. सदर स्मार्ट मोबाईलबाबत त्याचेकडे विचारणा केली असता त्याने समाधानकारक उत्तरे दिली नाहीत. त्यास विश्वासात घेवून त्याचेकडे चौकशी केली असता त्याने शिवाजीनगर, बंडगार्डन, निगडी पोलीस स्टेशनचे हद्दीत उघडया दारवाज्यावाटे मोबाईल चोरीचे गुन्हे केल्याचे कबूल केले आहे.

सदर विधिसंघर्षीत बालकाकडून विविध कंपन्यांचे २१ स्मार्ट मोबाईल फोन कि.रु. ५,५०,०००/- तसेच एक फास्टट्रॅक कंपनीचे घडयाळ ३०००/- व सोन्याची ०६ ग्रॅमची चैन कि.रु. १५,०००/- असा एकुण ५,६८,०००/- चा माल त्याचे ताब्यातून हस्तगत करण्यात आला आहे. तसेच सदर मुद्देमाल संबंधित पोलीस स्टेशनला रिपोर्टाने देण्यात येत आहेत. तसेच त्याने इतर मोबाईल कोठून चोरी केले आहेत या बाबत तपास चालू आहे. या अगोदर ऑक्टोबर २०१६ मध्ये याच विधिसंघर्षीत बालकाकडून १२ स्मार्ट मोबाईल फोन शिवाजीनगर पोलीस स्टेशनने हस्तगत करून त्याचेवर कारवाई करण्यात आली होती. परंतू त्याने अद्यापही उघडया दारवाज्यावाटे मोबाईल चोरीचे काम बंद केले नाही.

सदरची कारवाई ही श्री. दिपक साकोरे, अतिरीक्त कार्यभार अपर पोलिस आयुक्त, गुन्हे, श्री पी.आर.पाटील, पोलिस उप आयुक्त, गुन्हे. श्री सुरेश भोसले, सहा.पोलिस आयुक्त, गुन्हे-१ यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. नितिन भोसले-पाटील, स.पो.निरी. धनंजय कापरे, पोउपनिरी दिनेश पाटील, सपोफौज. शशिकांत शिंदे, रविंद्र कदम, संभाजी भोईटे, पो.हवा. रिजवान जिनेडी, प्रकाश लोखंडे, मेहबुब मोकाशी, उमेश काटे, श्रीकांत वाघवले, इरफान मोमीन, तुषार खडके, सुधाकर माने, सुभाष पिंगळे, अशोक माने, प्रशांत गायकवाड, यांनी केली आहे.

